# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषिनगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र) भारत

**डॉ. एस.आर. काळबांडे**
**कुलसचिव**

फॅक्स : ०७२४–२२५८३७२
ई-मेल : registrar@pdkv.ac.in


**वाचा :** १) मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुबंई शासन परिपत्रक, क्रमांक : संकिर्ण- २०२१ /प्र.क्र. ०६/विशि -३ दि. ०७ जानेवारी, २०२२

२) मा. अवर सचिव, कृषि व पदुम, मंत्रालय, मुबंई मा. महासंचालक, कृषि परिषद, पुणे यांना निर्देशित केलेले पत्र दि. १०/०१/२०२२.

३) जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय, अकोला तर्फे निर्गमीत आदेश क्र. कक्ष-२/गृह/प्रस/कावि- /२०२१ दि. ०९/०१/२०२२

**परिपत्रक**

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/८५४३/२०२२ दि.१०/०१/२०२२

कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्याकरीता जिल्हा प्रशासनाने संपुर्ण जिल्हयात दि. ०९/०१/२०२२ च्या मध्यरात्रीपासुन दि. १५/०२/२०२२ च्या मध्यरात्रीपर्यंत संचारबंदी तसेच जमावबंदीचे आदेशासह इतर निर्बंधाबाबतचे मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी आदेश निर्गमित केलेले आहेत.

सदर आदेशाचा आधार घेवुन निर्बंध कालावधीत विद्यापीठ स्तरावर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१ मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशामधील मुद्दा क्र. २ नुसार **(शासकिय कार्यालयांबाबत)** विद्यापीठातील सर्व कार्यालये, महाविद्यालये, संशोधन केंद्र व इतर यांनी प्रशासकिय कार्यालये बाबत (आरोग्य सेवा, सुरक्षा सेवा, विज, पाणि पुरवठा, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सेवा, प्रक्षेत्रे तथा अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी वगळुन) कार्यालय प्रमुख यांनी आदेशातील काटकोरपणे पालन करावे.

२ अभ्यागतांना कार्यालय प्रमुखाच्या लेखी परवानगीशिवाय कार्यालयामध्ये प्रवेश राहणार नाही.

३ मुद्दा क्र. १० नुसार **(क्रिडा स्पर्धात्मक कार्यक्रमाबाबत)** संबधीत अधिकारी यांनी आदेशातील काटकोरपणे पालन करावे.

४ मा. अवर सचिव, कृषि व पदुम, मंत्रालय, मुबंई यांनी निर्गमित केलेले संदर्भ क्र. २ चे पत्रानुसार विद्यापीठातंर्गत असलेले सर्व महाविद्यालये व संलग्न विद्यालयामधील अभ्यासक्रमाच्या कामकाजाबाबत दिलेल्या सुचनेचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

५ विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रक्षेत्र तसेच पशुसंवर्धन दुग्धव्यवसायासंबधीत कामे संशोधन केंद्रे नियमितप्रमाणे कार्यरत राहतील.

६ उपरोक्त आदेश हे जिल्हाधिकारी, अकोला यांनी अकोला जिल्हयाकरीता निर्गमित केलेले आहेत तथापी विद्यापीठ परिक्षेत्रातील अकोला जिल्हा वगळता इतर जिल्हयातील विद्यापीठ अधिनस्त कार्यालयाच्या बाबतीत संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यावाही करावी.

तसेच शासनाचे निर्गमित निर्देशाचे तंतोतंत पालन करावे.

मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीने निर्गमित.

कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

<u>प्रतिलीपी</u> :

१) संचालक (सर्व) ------------------------------------------------------------------------------------------------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------------------------------------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ------------------------------------------------------------------------------------
४) विभाग प्रमुख (सर्व) ------------------------------------------------------------------------------------------
५) प्राचार्य (घटक व संलग्न महाविद्यालय, विद्यालय, तंत्र निकेतन) ---------------------------------------
६) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) -------------------------------------------------------------------------------
७) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला
८) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
९) कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ---------------------------------------------------------------
१०) मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११) जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१२) मा. कुलगुरूंचे /कुलसचिवांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१३) सहायक कुलसचिव (साप्रवि/आस्था/परिक्षा/समिती), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१५) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१६) ---------------------------------------------------------------------------------------------------------

1/105

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय


दुरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स क्र.0724-2435007

email address - rdc_akola@rediffmail.com web address :www.akola.nic.in


क्र.कक्ष-2 /गृह/प्र स /कावि- /2021 दिनांक: 09 /01/2022

वाचा –
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च,2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूनर्वसन मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 Dated 4th April, 2021
5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे आदेश दिनांक 11 ऑगष्ट ,2021
6. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग आ.व्य. म.व पु यांचे पत्र क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 27 नोव्हेंबर 2021
7. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग आ.व्य. म.व पु यांचे पत्र क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 24 डिसेंबर 2021
8. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग आ.व्य. म.व पु यांचे पत्र क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 30 डिसेंबर 2021
9. महाराष्ट्र शासन महसूल आणि वन विभाग. आपत्ती व्यवस्थापन.मदत आणि पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई क्रमांक: DMU 2020/CR. 92/DisM-1. दिनांक 8 जानेवारी 2022

## आदेश

**ज्याअर्थी,** कोरोना विषाणूचा ओमिक्रॉन प्रकार जगभरात गेल्या काही दिवसांमध्ये सर्वात वेगाने पसरणारा प्रकार म्हणून समोर आला आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात ओमिक्रॉन कोविड-१९ ने बाधीत रुग्ण आढळून आले आहेत. आणि म्हणूनच विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही आपत्कालीन उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. ओमिक्रॉन प्रकाराच्या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही तातडीच्या उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे , दि ॲपडमिक डीसीज ॲक्ट- 1897 च्या कलम 2 अंतर्गत व आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अंतर्गत च्या इतर सर्व सक्षम तरतुदींसह महाराष्ट्र शासन आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन यांचे आदेश क्रमांक: DMU/2020/CR 92 DM 24 डिसेंबर, 2021 व 30 डिसेंबर 2021 रोजी निर्गमित केलेले निर्बधांची अधिक प्रभाविपणे अंमलबजावणी होण्याकरिता **दिनांक 9 जानेवारी 2022 चे रात्री 12.00 वाजेपासून** पुढील आदेशापर्यंत निर्बंधाबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

**त्याअर्थी,** मी, **नीमा अरोरा** भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी व अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,अकोला, साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005 व फौजदारी प्रक्रिया संहिता – 1973 चे कलम 144 नुसार प्रदान करण्यात आलेले अधिकार व संदर्भीय आदेश क्र. 9 अन्वये **संपूर्ण अकोला जिल्हयातील शहरी तसेच ग्रामीण भागाकरिता दिनांक 9 जानेवारी 2022 चे रात्री 12.00 वाजेपासून पुढील आदेशापर्यंत संचारबंदी तसेच जमावबंदी चे आदेशासह इतर निर्बंधाबाबतचे** आदेश निर्गमित करीत आहे.

| अ.क्र. | बाब | निर्बंध |
|---|---|---|
| 1 | **व्यक्तींच्या हालचालिंवर निर्बंध** | 1. **सकाळी 5 ते रात्री 11 वाजेपर्यंत 5 किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येता येणार नाही**<br>2. **रात्री 11 ते सकाळी 5 वाजेपर्यंत कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक किंवा वैद्यकिय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास पूर्णतः बंदी राहील.** |
| 2 | शासकीय कार्यालये | 1. **अभ्यागतांना कार्यालय प्रमुखांच्या स्पष्ट आणि लेखी परवानगीशिवाय प्रवेश राहणार नाही.**<br>2. कार्यालय प्रमुखांद्वारे नागरीकांसोबत व्हीडीओ कॉन्फरंसींग द्वारे ऑनलाइन संवाद साधण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | 3. स्थानिक अथवा बाहेरुन येणा-या अभ्यागतांसोबत व्हीडीओ कॉन्फरंसीद्वारे सभेचे आयोजन करण्यात येईल.<br>4. कार्यालय प्रमुख यांनी आवश्यकतेनुसार कर्मचारी यांचे कामाचे तास ठरवून कामाचे नियोजन करावे. तसेच शक्य असल्यास Work From Home ला प्राधान्य देण्यात यावे.<br>5. कोविड अनुरूप वर्तनाचे उलंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.<br>6. कार्यालय व्यवस्थापनाने कार्यालयामध्ये थर्मल स्कॅनर, हँड सॅनिटायझर इ. ची व्यवस्था करण्यात यावी . |
| 3 | खाजगी कार्यालये | 1. व्यवस्थापनाने कर्मचारी यांच्या कामाचे तास निश्चित करुन शक्यतोवर Work from Home चे माध्यमातून कामे करावी.<br>2. व्यवस्थापनाने नियमित उपस्थितीच्या 50 % पेक्षा जास्त कर्मचारी संख्या उपस्थित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>3. ज्या आस्थापना 24 तास सुरु राहतात अशा ठिकाणी शिफ्ट नुसार कामे निश्चित करण्यात यावी.<br>4. कर्मचा-यांना अत्यावश्यक कामासाठी प्रवास करतेवेळी कार्यालयाचे ओळखपत्र निर्गमित करण्यात यावे. तसेच ते सोबत बाळगने बंधनकारक राहील.<br>5. लसीकरणाच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या कर्मचा-यांनाच कार्यालयामध्ये प्रवेश राहील. तसेच ज्यांनी लसीकरण केले नाही त्यांना लसीकरण करुन घेणे बाबत प्रोत्साहीत करण्यात यावे.<br>6. कार्यालयामध्ये कोविड अनुरूप वर्तनाचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.<br>7. व्यवस्थापनाने कामाचे तास ठरवितांना महिला कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि सुविधा विचारात घ्यावी. |
| 4 | **विवाह समारंभ Marrages** | जास्तीत जास्त 50 व्यक्ती |
| 5 | **अंत्यविधी Funeral and Last Rites** | जास्तीत जास्त 20 व्यक्ती |
| 6 | **सामाजिक / धार्मिक / सांस्कृतिक / राजकीय कार्यक्रम** | जास्तीत जास्त 50 व्यक्ती |
| 7 | **शाळा आणि महाविद्यालये, कोचिंग क्लासेस** | **दिनांक 15 फेब्रुवारी 2022 पर्यंत बंद राहतील.**<br>**केवळ खाली बाबींना मुभा राहील.**<br>1. इयत्ता 10 वी व 12 वी करिता विविध शैक्षणिक मंडळांनी निश्चीत केलेले उपक्रम.<br>2. प्रशासकीय उपक्रम आणि वर्गातील शिकवण्यांव्यतिरिक्त शिक्षकांनी हाती घेतलेले उपक्रम.<br>3. विशेषत: शालेय शिक्षण विभागाद्वारे निर्देशित किंवा परवानगी असलेले उपक्रम. कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग, तांत्रिक आणि उच्च शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महिला आणि बाल विकास विभाग किंवा कोणतेही वैधानिक प्राधिकरण.<br>4. इतर अत्यावश्यक उपक्रमाकरिता SDMA राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडून मान्यता घ्यावी लागेल. |

(3)

| | | |
|---|---|---|
| 8 | स्विमिंग पूल , जिम, स्पा, वेलनेस सेंटर आणि ब्युटी पार्लर | पूर्णतः बंद |
| 9 | हेअर कटींग सलून | 1. 50 % क्षमतेसह सुरु राहतील.<br>2. दररोज रात्री 10 ते सकाळो 7 पर्यंत बंद राहतील.<br>3. हेअर कटींग सलून मधील इतर उपक्रम असल्यास ते पूर्णतः बंद राहतील.<br>4. कोविड अनुरूप वर्तनाचे पालन करणे बंधनकारक राहील.<br>5. काम करणा-या व्यक्तींने लसीकरणाचे दोन्ही मात्रा घेतल्याचे बंधनकारक राहील. |
| 10 | क्रीडा स्पर्धात्मक कार्यक्रम | केवळ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या स्पर्धा खालील बंधनासह घेता येतील.<br>a. प्रेक्षक नसावेत.<br>b. सर्व खेळाडू आणि आयोजकांनी बायो-बबल शेडयुल करावे.<br>c. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाकरिता भारत सरकारने निश्चित केलेले सर्व नियम लागू राहतील.<br>d. दर तिन दिवसांनी प्रत्येक खेळाडू तसेच व्यवस्थापनाने RTPCT /RAT करणे बंधनकारक राहील.<br>e. जिल्हास्तरीय कोणत्याही स्पर्धा आयोजित करता येणार नाही. |
| 11 | मनोरंजन उद्याने, प्राणीसंग्रहालय, संग्रहालये, किल्ले आणि सामान्य लोकांसाठी इतर तिकीट असलेली ठिकाणे/ स्थानिक पर्यटन /खेळ | पूर्णतः बंद |
| 12 | शॉपिंग मॉल्स, मार्केट कॉम्प्लेक्स निर्बंधासह सुरु राहतील. | 1. 50 % क्षमतेने सुरु ठेवता येईल. पूर्ण क्षमता व 50 % क्षमता या बाबतचे माहितीचे फलक दर्शनि भागात लावणे आवश्यक राहील.<br>2. फक्त लसीकरणाच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या व्यक्तींनाच परवानगी राहील<br>3. रात्री १० ते सकाळी ५ पर्यंत बंद राहतील.<br>4. सर्व दिवशी होम डिलिव्हरीला परवानगी राहील. |
| 13 | रेस्टोरेंट / कॅटरींग | 1. 50 % क्षमतेने सुरु ठेवता येईल. पूर्ण क्षमता व 50 % क्षमता या बाबतचे माहितीचे फलक दर्शनि भागात लावणे आवश्यक राहील.<br>2. फक्त लसीकरणाच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या व्यक्तींनाच परवानगी राहील<br>3. रात्री 10 ते सकाळी 5 पर्यंत बंद राहतील.<br>4. सर्व दिवशी होम डिलिव्हरीला परवानगी राहील. |
| 14 | नाट्यगृह / सिनेमा थियेटर | 1. 50 % क्षमतेने सुरु ठेवता येईल.<br>2. पूर्ण क्षमतेची माहिती तसेच सध्याच्या प्रेक्षकांची संख्या आस्थापनाबाहेरील सूचना फलकावर प्रदर्शित करणे आवश्यक राहील.<br>3. केवळ पूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींनाच परवानगी राहील.<br>4. सर्व दिवस रात्री १० ते सकाळी ८ पर्यंत बंद राहील. |
| 15 | आंतरराष्ट्रीय प्रवास | भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार. |

| | | |
|---|---|---|
| 16 | स्थानिक प्रवास | हवाई मार्गाने , रेल्वेने, रस्त्याने प्रवास करणा-या व्यक्तींना लसीकरणाच्या दोन्ही मात्रा पूर्ण झालेल्या तसेच RTPCR Test चाचणी अहवाल निगेटीव्ह असल्याचे प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील. (सदर प्रमाणपत्र 72 तासाच्या कालावधीकरिता वैध राहील. ) उक्त बाबी हया ड्रायव्हर, क्लीनर तसेच प्रवास करणा-या कर्मचा-यांना लागू राहतील. |
| 17 | कार्गो वाहतूक , औद्योगकी उपक्रम, बांधकाम उपक्रम | पूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींद्वारे सुरु ठेवता येईल. |
| 18 | सार्वजनिक वाहतूक | नियमित वेळेनूसार पूर्ण लसीकरण झालेल्या प्रवाशीसह सुरु ठेवता येईल. |
| 19 | UPSC/MPSC, वैधानिक प्रधिकरण , सार्वजनिक संस्थेद्वारे आयोजित परिक्षा | 1. राष्ट्रीय स्तरावर होणा-या सर्व स्पर्धात्मक परिक्षा भारत सरकार यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार घेता येतील.<br>2. परिक्षेकरिता उपस्थित राहण्याकरिता हॉल टिकीट तसेच इतर आवश्यक दस्तऐवज सोबत बाळगणे अनिवार्य राहील.<br>3. राज्यस्तरावरील आयोजीत सर्व स्पर्धात्मक परिक्षा जेथे हॉल टिकीट पूर्वीच निर्गमित केले आहे. आणि परिक्षेच्या तारखा आधिच निश्चित करण्यात आल्या आहेत.<br>4. इतर परिक्षेरिता राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांची मजूरी अत्यावश्यक राहील.<br>5. परिक्षेदरम्यान कोविड अनूरूप वर्तनाचे पालन करणे बंधनकारक राहील. |

a. विमानतळ, रेल्वे स्थानके, बस स्थानकांकडे किंवा तेथून 24 तास सुरू असलेल्या प्रवासासाठी वैध टिकीट सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

b. दुकाने, रेस्टॉरंट, हॉटेल किंवा ई-कॉमर्समध्ये गुंतलेल्या कोणत्याही आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यक्तींना पूर्ण लसीकरण करणे आवश्यक राहील. उल्लंघन करणा-या व्यवस्थापनास जबाबदार धरले जाईल आणि या आवश्यकतेचे उल्लंघन करणारे कोणतेही प्रकरण आढळल्यास, संबंधीत आस्थापना नियमानूसार बंद केली जाईल

c. सर्व सावर्जनिक ठिकाणी वावरतांना तसेच शासकीय कार्यालयामध्ये येणा-या नागरीकांनी मास्कचा वापर करणे अनिवार्य राहील.

d. कोणत्याही परिस्थीतीत कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे तसेच कोविड अनुरुप वर्तनाचे पालन केले जात आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी सक्षम प्राधिका-याला संबंधीत आस्थापना यांनी तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. निर्बंधाचे उल्लंघन करणा-यावर तसेच संबंधीत आस्थापनेवर दंडनीय कारवाई संबंधीत प्राधिकारी यांचेकडून करण्यात येईल.

e. कोविड संदर्भाने दिनांक 25 डिसेंबर 2021 रोजी निर्गमित केलेल्या आदेशातील निर्बध कायम राहतील.

f. कोविड नियमांचे उलंघन करणा-या व्यक्तींवर/आस्थापनेवर दंडात्मक कारवाई करण्याबाबतचे दंड आकरणाची आदेश यापूढेही कायम राहतील. या बाबत काटेकारपणे तपासणी व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत अनुज्ञप्ती प्राधिकारी, आयुक्त महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधिक्षक अकोला , महसूल विभाग तसेच ग्रामिण भागात गट विकास अधिकारी तसेच नागरी भागात संबधित नगर पालीका/नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांची राहील.

***सदर आदेश दिनांक 9 जानेवारी 2022 पासून पुढील आदेशापर्यंत संपूर्ण अकोला जिल्हयाकरिता लागू करण्यात येत आहेत.***

उक्त आदेशाचा भंग करणा-या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता 1860 च्या कलम 188 अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापण कायदा- 2005 मधील कलमानुसार शिक्षेस पात्र असलेला

5

अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात यईल.
सदर आदेश फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 चे तरतुदीनुसार लागू करण्यात येत आहेत.

सदरहु आदेश आज दिनांक 9 जानेवारी 2022 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय

(नीमा अरोरा, भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी, अकोला.

प्रतिलीपी:-

1. मा.विभागीय आयुक्त अमरावती यांना सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला.
4. आयुक्त, महानगर पालीका अकोला.
5. सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन अकोला.
6. जिल्हा पुरवठा अधिकारी अकोला.
7. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अकोला.
8. उपविभागीय अधिकारी अकोला/अकोट/बाळापूर/मुर्तिजापूर ,
9. तहसिलदार / मुख्याधिकारी नगर परिषदनगर पंचायत
10. जिल्हा माहिती अधिकारी अकोला.

(नीमा अरोरा, भा.प्र.से. )
जिल्हादंडाधिकारी, अकोला